


**तीळगूळ घ्या, गोड बोला**

आज मकर संक्रांत. हा संक्रमणाचा काळ आपल्या साऱ्यांच्या जीवनात उज्ज्वल ठरो हीच शुभकामना.
– संपादक

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




www.surajyadigital.com । मंगळवार, दि. १४ जानेवारी २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १०७ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


# देवदुर्लभ सोहळा पाहुनी, आम्ही झालो कृतार्थ!



भक्तीरसाच्या चैतन्यदायी वातावरणात श्री सिध्दरामेश्वरांचा अक्षता सोहळा लक्ष लक्ष नयनांच्या साक्षीने सोमवारी संमती कट्ट्यावर पार पडला. तहान, भूक हरपलेली...नंदीध्वजांच्या आगमनाची ओढ... श्री सिध्देश्वरांचा जयजयकार... उत्तरायणाच्या स्पर्शातील सूर्यनारायणाची जाणवलेली तीव्र किरणं... झाडीझुडुपातील पक्ष्यांचा किलबिलाट अशा उत्साही वातावरणात संमती कट्ट्यावर अक्षतांचा वर्षाव झाला. 'देवदुर्लभ हा सोहळा पाहुनी, आम्ही झालो कृतार्थ' हेच भाव सागररुपी भक्तांच्या चेहऱ्यावर होते. पवित्र कर्मामुळे सद्गती प्राप्त होते. सात्विक कर्म हेच परमेश्वरांशी एकरूप होण्याचे साधन होय, असं श्री सिध्देश्वर महाराज आपल्या वचनात म्हणतात. त्याची अनुभूती या अनुपम्य सोहळ्यात आली. (छायाचित्र - आप्पा बनसोडे)

## वाघोबाला पकडण्यासाठी येणाऱ्या टीमचा थांगपत्ताच नाही

### धाराशिवमधील गुंजेवाडीत वाघ दिसल्याची चर्चा



✔ **सोलापूर** : बार्शी तालुक्यासह धाराशिव जिल्ह्यातील येडशी व रामलिंग भागात धुमाकूळ घालणाऱ्या वाघाला पकडण्यासाठी वनखात्याची एक टीम चंद्रपूरहून येणार होती. तसे आदेशही देण्यात आले होते मात्र तीन दिवस झाले तरी ही टीम अजूनपर्यंत सोलापुरात दाखल झालेली नाही.सोमवारी याबाबत येथील वनखात्याशी संपर्क साधला असता अजून तरी टीम आलेली नाही,असे सांगण्यात आले.सोमवारी मध्यरात्रीपर्यंत कदाचित येवू शकेल,असे वन खात्याच्या एका सूत्राने सुराज्यशी बोलताना सांगितले.दरम्यान धाराशिव जिल्ह्यातील गुंजेवाडी येथे वाघ दिसल्याची खबर ग्रामस्थांनी वनखात्याला दिल्याची चर्चा आहे.

यवतमाळहून आलेल्या या वाघाने बार्शी तालुक्यातील ढेबरेवाडी,कारी आणि वैराग भागासह सीमेलगतच्या येडशी व रामलिंग भागात धुमाकूळ घातला होता.वाड्या वस्त्यांवरील १२ मुक्याप्राण्यांचा या वाघाने फडशा पाडला होता.त्यामुळे वाड्या-वस्त्यांवरील शेतकरी आणि शेतमजूर यांच्यात भीतीचे वातावरण पसरले होते.वनखात्याच्या कॅमेऱ्यात ढेबरेवाडी येथील तलावाजवळ वाघ कैद झाला होता.सुरूवातीला त्या वाघाला पकडू नये,असे वनखात्याच्या वरिष्ठ कार्यालयाकडून आदेश होते मात्र ग्रामस्थांचा दबाव वाढल्यानंतर त्याला जेरबंद करण्याचा आदेश द्यावा लागला.

आताच्या तंत्रज्ञानानुसार वाघाला पकडण्यासाठी नवे कौशल्य विकसित झाले आहे.त्यासाठी चंद्रपूरची एक टीम सोलापुरात दाखल होणार असल्याचे सांगण्यात आले होते मात्र अद्यापही ही टीम न आल्याने लोकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

## दीपकआबांवर गंडांतर, खैरावमधील प्रॉपर्टीचा होणार लिलाव

### थकीत कर्जप्रकरणी पुण्याच्या बँकेने उगारला बडगा



✔ **सोलापूर/प्रतिनिधी**

सांगोल्याचे माजी आमदार दीपकआबा साळुंके -पाटील यांच्यावर डीसीसी बँकेनंतर दुसरे एक संकट ओढवणार आहे. पुण्यातील एका बँकेचे ते थकबाकिदार आहेत.त्याच्या वसुलीसाठी दीपकआबांच्या माढा तालुक्यातील प्रॉपर्टीचा लिलाव येत्या १३ फेब्रुवारी रोजी होणार आहे.साळुंके-पाटील हे सोलापूर डीसीसी बँकेचेही थकबाकिदार आहेत.लवकरच होणाऱ्या कारवाईत त्यांचेही नाव आहे.त्यामुळे ते दुहेरी संकट ओढवल्याने सोलापूरच्या राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

पुण्यातील शिवाजीराव भोसले सहकारी बँकेकडून दीपकआबा साळुंके पाटील यांनी कर्ज घेतले होते. त्यांच्यावर २७.५६ कोटींचे कर्ज थकीत आहे. त्याच्या वसुलीसाठी या बँकेने त्यांच्या खैराव येथील जमिनी ताब्यात घेतल्या होत्या. वसुली अधिकारी बी.बी. दरवडे यांनी सदर जमिनींचा लिलाव पुकारला होता. पण हवा तसा प्रतिसाद न मिळाल्यामुळे दीपकआबा यांच्या जमीन प्रॉपर्टीचा पुन्हा लिलाव पुकारावा लागला आहे.

भोसले सहकारी बँक ही अवसायानात गेलेली बँक असून या बँकेतील थकीत कर्जापोटी माढा तालुक्यातील (खैराव) तीन ठिकाणच्या जमिनी बँकेने यापूर्वीच ताब्यात घेतल्या आहेत. त्या जागांचे यापूर्वीही लिलाव पुकारले होते. पण प्रतिसाद न मिळाल्यामुळे बँकेला पुन्हा लिलाव पुकारावा लागला आहे. माढा तालुक्यात खैराव येथे १२ हेक्टर ६३ आर, १५ हेक्टर ६३ आर आणि १५ हेक्टर ६८ आर या जमिनी गहाणखताद्वारे तारण ठेवलेल्या होत्या. दरम्यान शिवाजीराव भोसले सहकारी बँक अवसायानात गेली. वसुली अधिकारी बी.बी. दरवडे यांनी सदर जमिनींचा लिलाव पुकारला होता. पण हवा तसा प्रतिसाद न मिळाल्यामुळे दीपक आबा यांच्या जमीन प्रॉपर्टीचा पुन्हा लिलाव पुकारावा लागला आहे.


गेल्या आठवड्यात राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील सोलापूर दौऱ्यावर आले असता माजी आमदार दिलीप माने यांच्या निवासस्थानी दीपकआबांनी मंत्र्यांची भेट घेतली होती. सोलापूर जिल्हा सहकारी बँकेच्या बेकायदा कर्ज प्रकरणातील वसुली यादीत संचालक म्हणून दीपकआबांचे नाव आहे. या कारवाईची टांगती तलवार आहे. त्यासाठी ही भेट असावी, अशी चर्चा होती. त्यानंतर आठवडाभरातच शिवाजीराव भोसले सहकारी बँकेच्या कर्ज प्रकरणाची कारवाई समोर आली आहे.

> **सहकार क्षेत्रात खळबळ**
>
> गेल्या आठवड्यात अक्कलकोट तालुक्यातील काँग्रेसचे माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे आणि दत्ता शिंदे यांच्या मातोश्री शुगरवरील ७५ कोटींच्या थकीत कर्जापोटी पीएनबी बँकेने त्यांच्या प्रॉपर्टीचा प्रतीकात्मक ताबा घेतला होता. सहकार क्षेत्रात एकाच आठवड्यात अशा दोन घटनांनी नेत्यांच्या कर्जप्रकरणाची राजकीय वर्तुळात जोरात चर्चा सुरू आहे.

## अविवाहित तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

✔ **सोलापूर** : एका २२ वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना फताटेवाडी (ता.दक्षिण सोलापूर) येथे आज सोमवारी दुपारच्या सुमारास घडली.

शुभम रमेश राठोड (वय २२, रा. फताटेवाडी ता.दक्षिण सोलापूर) असे मयताचे नाव आहे.



सोमवारी दुपारी १ वयाच्या सुमारास घरात कोणी नसताना त्याने छताच्या लोखंडी हुकाला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतला होता. याची माहिती मिळाल्यानंतर त्याला फासातून सोडवून राजेंद्र राठोड (चुलते) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. मयत शुभम राठोड हा अविवाहित असून तो एनटीपीसी येथे कामाला होता. त्याच्या पश्चात आई-वडील १ भाऊ आणि १ बहीण असा परिवार आहे. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून यामागचे कारण समजले नाही.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




आज माझ्याकडून परखड लिखाणाची अपेक्षा ठेवू नका!

| |
|---|
| कल्याण |
| 180-95-357 |
| मुंबई |
| 380-12-138 |

## चोरट्याकडून १५ घरफोडीतील १९ लाखांचे दागिने जप्त

### ग्रामीण पोलीस दलाची कारवाई

✔ **सोलापूर/प्रतिनिधी**

जिल्ह्यातील मंगळवेढा, मोहोळ, मंद्रुप, अक्कलकोट, टेंभूर्णी आणि उत्तर सोलापूर तालुक्याच्या हद्दीतील १५ ठिकाणी घरफोड्या करणाऱ्या रेकॉर्डवरील चोरटयाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी नुकतीच अटक केली आहे. तपासत त्याच्याकडून १९ लाख २८ हजार ५०० रूपये किंमतीचे (२८ तोळे) सोने जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

अशोक उर्फ आशिकाऱ्या छपरू काळे (वय ३५ रा. भंडारकवठे ता. दक्षिण सोलापूर सध्या रा. नाईकवाडी प्लॉट, मोहोळ) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

फौजदार ख्वाजा मुजावर यांच्या गोपनीय बातमी वरून रेकॉर्डवरील आरोपी मोहोळ येथे असल्याची माहिती मिळाली. सहाय्यक निरीक्षक नागनाथ खुणे यांनी पथकासह मोहोळ येथे गेले. तेथे त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने उडवा उडवीची उत्तरे दिली.

संशय आल्याने त्याला ताब्यात घेऊन विश्वासाने चौकशी केली असता, त्याने मागील ७ ते ८ महिन्यापूर्वी इतर साथीदारांच्या मदतीने मंगळवेढा शहरात रात्रीच्या वेळी घरफोड्या केल्याचे सांगितले. या व्यतिरिक्त त्याने जिल्ह्यात अन्य ठिकाणीही चोऱ्या केल्याची कबुली दिली. ही कामगिरी पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक प्रीतम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर, उपनिरीक्षक राजेश गायकवाड, सहायक फौजदार नारायण गोलेकर, हवालदार धनाजी गाडे, मोहन मनसावले, महिला हवालदार मोहिनी भोगे, सागर ढोरे-पाटील, अक्षय डोंगरे, यश देवकते, योगेश जाधव, समर्थ गाजरे, चालक समीर शेख यांनी पार पाडली.



जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासह पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, पोलीस निरीक्षक सुरज निंबाळकर व अन्य कर्मचारी.

## वृद्धास दमदाटी करत ठार मारण्याची धमकी, गुन्हा दाखल

✔ **सोलापूर** : वृद्धास दमदाटी करत जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सन २०१६ पासून ते आज तागायापर्यंत सिद्धार्थ हौसिंग सोसायटी येथे घडली. याप्रकरणी आत्माराम जयवंत चंदनशिवे (वय-७०,रा.सिद्धार्थ बॅकवर्ड क्लास,को हौसिंग सोसायटी) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून प्रमोद गायकवाड व हर्षजीत गायकवाड यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.




सन २०१६ पासून ते आज तगायतपर्यंत प्रमोद गायकवाड व हर्षजीत गायकवाड यांनी फिर्यादी आत्माराम चंदनशिवे यांना तू दुकान खाली करून माझ्या ताब्यात दे नाहीतर आम्हाला महिना पाच हजार रुपये दे असे म्हणून त्रास देण्यास सुरुवात केली. चंदनशिवे यांना दमदाटी करून वारंवार जीवे मारण्याची धमकी देत दुकान बंद पाडण्यास भाग पाडले. त्यानंतर चंदनशिवे यांनी वरील संशयित आरोपी यांच्या त्रासाला कंटाळून पैसे देत नाही म्हणाल्यावर त्यांनी तुझी मुले सरकारी नोकरीत आहेत. त्यांच्यावर बोगस केसेस घालतो असे म्हणून धमकी दिली. पुढील तपास पो.स.ई.बनकर हे करीत आहेत.